२२/१२/२०१०
०१/२/२०१०
नक्कल तयार दिनांक १०/१२/२०१०
नक्कल दिली दिनांक

महाराष्ट्र संस्था निबंधक
नाशिक प्रदेश, नाशिक.

परिशिष्ट — ब

1. संस्थेचे नांव :— ~~इंडियन~~ अकॅडेमी ऑफ पेडीयाट्रीक्स, ~~महाराष्ट्र राज्य~~ शाखा, बी विंग रामबाग सोसायटी, तिसरा मजला, गंगापूर रोड, नाशिक — 422 005.

संस्थेच्या कार्यालयाचा :— ~~इंडियन~~ अकॅडेमी ऑफ पेडीयाट्रीक्स, ~~महाराष्ट्र राज्य~~ शाखा, बी विंग रामबाग सोसायटी, तिसरा मजला, गंगापूर रोड, नाशिक — 422 005.

व्दारा :— डॉ. केदार मालवतकर.

2. संस्थेचे कार्यक्षेत्र :— संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राहील.

3. संस्थेचे उद्दिष्टे ::

1. पौगंडावस्थेतील बालके, मुले व त्यांचे पालक यांना मुलांच्या शारिरीक, मानसिक व सामाजिक आरोग्य वाढीसाठी योग्य सल्ला व मार्गदर्शन करणे.

2. बालरोग शास्त्राचा सर्वोपरीने प्रचार व प्रसार करणे.

सभासदांना वैद्यकीय तंत्रज्ञाना करता एकत्र आणणे व सभासदांच्या व्यावसायिक आचरणासाठी नियम तयार करणे.

बालरोग शास्त्राचा प्रचार व प्रसार करण्यासाठी ~~संस्था स्थापन करणे~~.

5. बालरोग शास्त्राच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वाचनालय, प्रयोगशाळा व संशोधन संस्था ~~स्थापन करणे~~.

6. बालरोग शास्त्राचा अभ्यास व संशोधनसाठी विद्यार्थी, संस्था यांना अनुदान, बक्षिसे व शिष्यवृत्ती याव्दारे मदत करणे.

7. बालरोग शास्त्राच्या अभ्यासासाठी स्वतः वा इतरांचे मदतीने बक्षीसे, प्रमाणपत्र वा उल्लेखनीय कामांकरता प्रशस्तीपत्र बहाल करणे व त्यासंबंधातील सर्व परीक्षा (वा) इतर कार्यक्रमांचे नियोजन करणे.

8. बालरोग शास्त्रासंबंधी उपलब्ध माहितीचे प्रकाशन करणे व संस्थेचे अधिकृत नियतकालीक वा अहवाल यांचे संपादन व प्रकाशन करणे.

9. ~~संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी नोकर वर्ग तयार करणे व त्यासाठी होणारा खर्च करणे.~~

10. संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी व्याख्यान, अधिवेशन, अभ्यास वर्ग व प्रदर्शन आयोजित करणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

TRUE COPY
MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics
Secretary Treasurer

11. महाराष्ट्रातील बालरोग शास्त्रांमधील समस्या याविषयी मतप्रदर्शन करणे ; बालरोग शास्त्राचा वापर व प्रसार यासंबंधी कायदा तयार करणेकरीता मत प्रदर्शन करणे व भाग घेणे.

12. ~~संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी स्वतः अथवा संलग्न संस्थांबरोबर सहकार्य करुन योग्य ती कार्यवाही करणे.~~

13. ~~संस्थेच्या कामाच्या नियोजनाकरता अधिकारी व सेवक वृंद ह्यांची नेमणूक करणे व त्यांचे वेतन ठरविणे.~~

14. ~~संस्थेच्या उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अनुशांगिक व योग्य त्या गोष्टींची पूर्तता करणे.~~

BEFORE ME

1/1/2008

SANJAY BHASKAR DABIR
ADVOCATE & NOTARY
Chamber No.327, Building No.1,
Dist. Court, Nashik-422 002.

NOTARY * S. B. DABIR AREA - NASHIK REGD. NO. 761 GOVT. OF MAHARASHTRA

Noted & Registered
at Serial Number 6/2008
1/1/2008

NOTARY S. B. DABIR AREA - NASHIK REGD. NO. 761 GOVT. OF MAHARASHTRA NOTARIAL

NOTARIAL

NOTARY * S. B. DABIR AREA - NASHIK REGD. NO. 761 GOVT. OF MAHARASHTRA NOTARIAL NOTARIAL

TRUE COPY

MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

अध्यक्ष

उपाध्यक्ष

सचिव

Secretary

Treasurer

आयकर विभाग
INCOME TAX DEPARTMENT

भारत सरकार
GOVT. OF INDIA

MAHA ACADEMY OF PEDIATRICS

भारत सरकार

11/11/2009

Permanent Account Number

AACTM5769Q

01062010

**TRUE COPY**

MAHA ACADEMY OF PEDIATRICS

Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary

Treasurer

महा अकॅडेमी ऑफ पेडीयाट्रिक्स

~~डियन अकॅडेमी ऑफ पेडीयाट्रीक्स, महाराष्ट्र राज्य शाखा~~, बी विंग रामबाग सोसायटी, तिसरा मजला, गंगापूर रोड, नाशिक – 422 005 या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यांत आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण पत्ते, नांवे, वय, हुद्दे, राष्ट्रीयत्व आणि व्यवसाय खालीलप्रमाणे आहे.

| नं. | सभासदांची नांवे | हुद्दा | वय | व्यवसाय | नागरीकत्व | राहणार |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | डॉ. व्यंकटेश एस. यजुर्वेदी | अध्यक्ष | 45 | वै.अधिकारी | भारतीय | सोलापूर |
| 2. | डॉ. अतुल कुलकर्णी | उपाध्यक्ष | 40 | वै.अधिकारी | भारतीय | सोलापूर |
| 3. | डॉ. केदार मालवतकर | सचिव | 40 | वै.अधिकारी | भारतीय | नाशिक |
| 4. | डॉ. शाम खंडेलवाल | सहसचिव | 42 | वै.अधिकारी | भारतीय | औरंगाबाद |
| 5. | डॉ. शामकांत चौधरी | खजिनदार | 39 | वै.अधिकारी | भारतीय | नाशिक |
| 6. | डॉ. राजेंद्र कुलकर्णी | व्य.स.सदस्य | 41 | वै.अधिकारी | भारतीय | नाशिक |
| 7. | डॉ. चंद्रकांत सुरवसे | व्य.स.सदस्य | 45 | वै.अधिकारी | भारतीय | नाशिक |

अध्यक्ष          A. A. Kulkarni उपाध्यक्ष          सचिव

**TRUE COPY**
MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary          Treasurer

आम्ही खाली सहया करणारे संस्थापक सदस्य, ~~इंडियन अकॅडेमी~~ ऑफ ~~पेडीयाट्रीक्स, महाराष्ट्र राज्य शाखा,~~ बी विंग रामबाग सोसायटी, तिसरा मजला, गंगापूर रोड, नाशिक, जाहिर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशने आम्ही एकत्र येऊन इंडियन अकॅडेमी ऑफ पेडीयाट्रीक्स, महाराष्ट्र राज्य शाखा, बी विंग रामबाग सोसायटी, तिसरा मजला, गंगापूर रोड, नाशिक ही संस्था आज दिनांक ~~20/12/2007~~ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

| नं. | सभासदांची नांवे | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| 1. | डॉ. व्यंकटेश एस. यजुर्वेदी | अध्यक्ष | |
| 2. | डॉ. अतुल कुलकर्णी | उपाध्यक्ष | |
| 3. | डॉ. केदार मालवतकर | सचिव | |
| 4. | डॉ. शाम खंडेलवाल | सहसचिव | |
| 5. | डॉ. शामकांत चौधरी | खजिनदार | |
| 6. | डॉ. राजेंद्र कुलकर्णी | व्य.स.सदस्य | |
| 7. | डॉ. चंद्रकांत सुरवसे | व्य.स.सदस्य | |

स्थळ : नाशिक

दिनांक : २०/१२/०७

वरील सहया करणा–या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधनापत्रावर सहया केल्या आहेत.

**नंदकिशोर हि. लाहोटी**
बी.कॉम., एलएल.बी., ॲडव्होकेट

विशेष कार्यकारी दंडाधिकारी / वकील
संपूर्ण नांव, पत्ता व शिक्का.

खरी प्रत / नक्कल

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक.

**TRUE COPY**

MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary

Treasurer

# परिशिष्ट – क

## नियम व नियमावली

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग, नाशिक

1) बालरोग संघटनेच्या निवेदिकेप्रमाणे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बालरोग संघटना स्थापन करण्यांत आलेली आहे.

2) महाराष्ट्र राज्य बालरोग संघटनेचे कामकाज नोंदणीकृत कार्यालयामार्फत करण्यांत येईल. संघटनेचे सचिवालय कायम स्वरुपी नाशिक येथे राहील.

3) संघटनेचे आर्थिक वर्ष 1 एप्रिल ते पुढील वर्षीच्या 31 मार्च पर्यंत असेल (हिशोबाचे).

4) ~~हया पुढील सर्व संबोधने जसे तो/त्यांचे/तो स्वतः याचाच अर्थ ती/तिचे/ति स्वतः असा लागू पडेल.~~

5) हया संघटनेचे सर्व कामकाज चार पदाधिकारी व पाच व्यवस्थापन समिती सदस्य त्यांच्यातर्फे चालविले जाईल.

6) सदस्य :

अ) हया संघटनेचे सदस्यत्व हे फक्त राष्ट्रीय बालरोग संघटनेच्या सदस्यांसाठीच राहील.

ब) हया संघटनेचे सदस्यत्व चार प्रकारे विभागीत करण्यांत आले आहे. 1) सर्वसाधारण 2) आजीवन 3) सहसदस्यता 4) सह–आजीवन.

क) राष्ट्रीय संघटनेचे साधारण/आजीवन/सह–सदस्य आणि सह आजीवन सदस्य असलेलेच राज्यस्तरीय संघटनेचे सदस्यतेसाठी या क्रमाने लागू होतील.

ड) संघटनेचा कोणीही सदस्य महाराष्ट्राबाहेर/भारताबाहेर राहावयास गेल्यास त्याच्याशी होणारा सर्व पत्र व्यवहार (हयात मासिके/मत प्रत्रिका/नियतकालीन धरून) हया कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या त्यांच्या शेवटच्या पत्त्यावर करण्यांत येईल. अशा सदस्याची इच्छा हा पत्र व्यवहार नवीन पत्त्यावर करण्याची असल्यास त्या अनुसार अधिक भार सोसण्याची जबाबदारी त्या सदस्याची राहील.

7) संघटनेचे सदस्यात्वाची शुल्क खालीलप्रमाणे राहील.

अ) स्वागत शुल्क सर्वसाधारण सभेमध्ये वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे आकारण्यांत येईल.

ब) वार्षिक सदस्यत्व शुल्क सर्वसाधारण सभेत वेळोवेळी ठरविल्या प्रमाणे घेण्यांत येईल.

TRUE COPY

MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary Treasurer

क) वार्षिक सदस्यत्व शुल्क वयाच्या 70 वर्ष पूर्णत्वानंतर लागू पडणार नाही. तसे लेखी निवेदन त्या सदस्याने कार्यालयास देणे अनिवार्य राहील.

8) अ) हया संघटनेचे सदस्यत्व मिळविणेसाठी वरील नियमात बसणा–या व्यक्तिला सुचिवणारा, दुजोरा देणारा व्यक्ती या साधारण किंवा आजीवन सदस्य असणें आवश्यक आहे.

ब) हया संदर्भातील कार्यवाहीची नियमावली सर्वसाधारण सभेत ठरविण्यांत येईल.

9) सचिवालयामध्ये सर्व सदस्यांची नांवे व शेवटचा माहिती असलेला पत्ता हयांची नोंद राहील. तसेच काही कारणास्तव एखाद्या सदस्यांची सदस्यत्वा रद्द झालेली असल्यास त्याचीही नोंद कार्यालयात राहील.

10) एखादया सदस्याला सदस्यत्वा रद्द करावयाची असल्यास तसे लेखी निवेदन देणे आवश्यक आहे. ही रद्दता असे लेखी निवेदन कार्यालयात मिळालेल्या तारखेपासून समजण्यांत येईल. जर पदाधिकारी / व्यवस्थापन समिती सदस्य यांना स्वतःची सदस्यता रद्द करावयाची असल्यास तशी आगाऊ लेखी एक महिन्याची सूचना देणे बंधनकारक राहील. तसेच पुढील पदाधिकारी / व्यवस्थापन समिती सदस्य नियुक्त होईपर्यंत त्याने कामकाज सांभाळणे आवश्यक राहील व त्यावर्षीचे वार्षिक सदस्यत्व शुल्क भरणे बंधनकारक राहील.

11) वार्षिक सदस्यत्वता दर वर्षीच्या 1 जानेवारी पासून सुरू होईल. एखादा नवीन सदस्य त्यावर्षीच्या दरम्यान सदस्य झाला असल्यास तो पूर्ण वर्षाचा सदस्य समजण्यांत येईल. परंतू सर्व प्रकारचे पत्र व्यवहार सदस्यत्वता सुरू झालेल्या तारखेनंतरच करण्यात येतील.

12) संघटनेचा सदस्य खालील गोष्टीस पात्र राहील :

अ) संघटनेच्या बैठका व अधिवेशनास उपस्थिती (आवश्यकतेनुसार सुचविण्यांत आलेले शुल्क भरून).

ब) संघटनेचे वाचनालय वापरण्याची मुभा.

क) आजीवन व सर्व साधारण सदस्यासाठी अधिकार व पात्रता समान राहील.

ड) सहसदस्य व सह आजीवन सदस्य हे कार्यालयीन पदाधिकारी पद व व्यवस्थापन समिती सदस्य हयांचा निवडनुकास पात्र राहणार नाही. तसेच संघटनेच्या कुठल्याही बैठका व निवडणूकांत त्यांना मतदानाचा हक्क राहणार नाही.

13) अ) वार्षिक सदस्यत्व शुल्क त्या वर्षीच्या 30 जून पर्यंत जमा न केल्यास असा सदस्य संघटनेच्या बैठकीत भाग घेऊ शकणार नाही. तसेच मतदान करू शकणार नाही व पदाधिकारी पद / व्यवस्थापन समिती सदस्य राहू शकणार नाही. अशा सदस्याशी संघटना पत्र व्यवहार करण्यास त्यानंतर बांधील राहणार नाही.

ब) अशा सदस्याचे नांव संघटनेच्या नोंदवहीतून रद्द वातल करण्यापूर्वी नोटीस देऊन 15 दिवसांची लेखी मुदत देण्यांत येईल.

TRUE COPY
MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics
Secretary Treasurer

14) एखादया सदस्याने नियमबाहय वर्तन केल्यास/व्यावसायिक नितिमत्तेचे उल्लंघन केलेले असल्यास अशा सदस्याबाबत राष्ट्रीय पदाधिका–यांनी घेतलेला निर्णय बंधनकारक राहील.

15) पदाधिकारी :

महाराष्ट्र राज्य बालरोग संघटनेचे पदाधिकारी खालीलप्रमाणे राहतील...

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | एक |
| सचिव | – | एक |
| खजिनदार | – | एक |
| सदस्य | – | पाच |

16) अ) अध्यक्षांचा कार्यकाल एक वर्षाचा असेल, सचिव व खजिनदार हयांचा कार्यकाल दोन वर्षांचा असेल हया पदाधिका–यापैकी कोणी राजीनामा दिल्यास पुढील पदाधिका–यांची नेमणूक होईपर्यंत आधीच्या पदाधिका–याने कामकाज पहाणे अनिवार्य राहील.

ब) अध्यक्षांचा एक वर्षाचा कार्यकाल संपल्यानंतर ते व्यवस्थापन समितीसाठी/पदाधिकारी पदासाठी पात्र राहणार नाहीत.

क) अध्यक्षांची नियुक्ती ही मागील वर्षी घेतल्या गेलेल्या राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशनाची जिल्हा शाखा करेल. अध्यक्ष पदासाठी इच्छूक असलेला उमेदवार हा संघटनेचा सलग 3 वर्षासाठी सदस्य असणे आवश्यक आहे. तसेच राज्य शाखेचा व्यवस्थापन समिती सदस्य अथवा कार्यालयीन पदाधिकारी अथवा दोन्ही पूर्ण एक वर्षासाठी असणे आवश्यक आहे.

ड) सचिवाची नियुक्ती नाशिक जिल्हा बालरोग संघटना करेल. इच्छूक उमेदवार हा सलग दोन वर्ष जिल्हा संघटनेचा सदस्य असणे आवश्यक आहे.

इ) खजिनदाराची नियुक्ती नाशिक जिल्हा बालरोग संघटना करेल. इच्छूक उमेदवार हा सलग दोन वर्ष जिल्हा संघटनेचा सदस्य असणे आवश्यक आहे.

ई) एक व्यक्ती एका वर्षासाठी एकच पद भूषवू शकेल.

ज) सर्व नियुक्ती ह्या त्यावर्षीच्या 1 जानेवारी ते 31 डिसेंबर पर्यंत राहतील.

17) अ) राज्य संघटनेचे सर्व कामकाज हे पदाधिकारी व व्यवस्थापन समिती सदस्य सांभाळतील, व्यवस्थापन समिती सदस्य हे सर्व साधारण/आजीवन सदस्यांमधून नियुक्त करण्यांत येतील/निवडण्यांत येतील.

ब) सर्व पदाधिकारी हे व्यवस्थापन समितीचे सदस्य राहतील.

क) व्यवस्थापन समितीचे सदस्य खालीलप्रमाणे नियुक्त करण्यांत येतील/निवडण्यांत येतील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

TRUE COPY

MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary Treasurer

1) व्यवस्थापन समितीमध्ये महाराष्ट्राच्या खालील पाच विभागातून पाच सदस्य निवडण्यांत / नियुक्त करण्यांत येतील (प्रत्येकी एक)

मुंबई व कोकण.
पश्चिम महाराष्ट्र
उत्तर महाराष्ट्र
मराठवाडा
विदर्भ

2) व्यवस्थापन समिती सदस्यत्वासाठी सर्व जिल्हा शाखाकडून इच्छूक उमेदवारांकडून लिखीत अर्ज राज्य सचिव आमंत्रित करतील.
3) एखादया विभागातून एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास राज्य अध्यक्ष सचिवालयाची सल्ला मसलत करून त्या विभागाचा प्रतिनिधीची निवड / नियुक्ती करतील.

ड) अचानक उद्भवलेल्या व्यवस्थापन समिती सदस्याचे रिक्त पद खालीलप्रमाणे भरले जातील.

1. रिक्त पदासाठी एखादी जागा रिक्त झाल्यास (पदाधिकारी व्यक्तिरिक्त) त्या वर्षासाठीचे रिक्त पदाची व्यवस्थापन समिती सहनियुक्ती करेल.
2. पदाधिका–या पैकी अचानक रिक्त झालेल्या अध्यक्षपदाची नियुक्ती / निवड ही मागील वर्षांच्या राज्यस्तरीय अधिवेशन झालेली जिल्हा शाखा करेल.
3. सचिव व खजिनदार हया पदांसाठी अचानक झालेल्या रिक्त पदासाठी नियुक्ती / निवड नाशिक जिल्हा शाखा करेल.
4. अशा प्रकारे सह नियुक्त झालेला सदस्य हा मुळ सदस्याच्या कालावधीसाठीच नियुक्त राहील.

इ) राष्ट्रीय बालरोग ~~संघटनेतील~~ संस्थेतील महाराष्ट्राचे पदाधिकारी व व्यवस्थापन समिती सदस्य हे राज्य ~~संघटनेच्या~~ संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे पदसिध्द (Ex-Officio) हया नात्यांने सदस्य राहतील. हयाच नात्याने मागील वर्षाचे अध्यक्ष व सचिव हे सुध्दा व्यस्थापन समितीचे सदस्य राहतील.

व्यवस्थापन समितीचे अधिकार व कर्तव्य

18) हया नियमावलीनुसार व्यवस्थापन समितीस सर्व हक्क राबवण्याचा अधिकार राहील.

19) व्यवस्थापन समितीस काही विशेष समिती व त्याचे संयोजक नेमण्याचा व त्या समितीचे अधिकार सुपूर्द करण्याचा अधिकार राहील.

20) व्यवस्थापन समितीला हया नियमावलीनुसार (~~संघटनेच्या~~ संस्थेच्या कामकाजाविषयी) काही इतर नवे नियम आखण्याचा अधिकार राहील.

21) अ) व्यवस्थापन समितीची बैठक वर्षातून किमान एक वेळा अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यांत येईल.
ब) व्यवस्थापन समितीची बैठकीचे संयोजन अध्यक्षांचा सल्यानुसार राज्याचे सचिव करेल.
क) अशा प्रकारच्या बैठकीस साधारणतः 30 दि[illegible] सूचना देण्यांत येईल आणीबाणीच्या / निकडीच्या प्रसंगी कमी[illegible] दिवसांनी सूचना देण्यांत येईल.

अध्यक्ष    सचिव

TRUE COPY
MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics
Secretary    Treasurer

22) व्यवस्थापन समितीची विशेष बैठक करण्यासाठी व्यवस्थापन समितीच्या किमान तीन सदस्यांनी तशी लेखी मागणी सचिवांकडे करणे आवश्यक राहील. अशी विशेष सभा सचिवांनी लेखी मागणी मिळाल्या दिवसापासून तीन आठवडयांच्या आत बोलवावी अशी विशेष सभेची तारीख व जागा ठरविण्याचा अधिकार अध्यक्ष व सचिव हयांना राहील.

23) व्यवस्थापन समितीची बैठक कायदेशीर होण्यासाठी किमान तीन सभासदांनी हजर राहणे गरजेचे आहे. जर तीन सभासद नसतील तर बैठक तहकुब करण्यांत येईल व त्याच दिवशी नवीन वेळेवर परत बोलवण्यांत येईल. अशाप्रकारच्या बैठकीला तीन सभासद असणे अनिवार्य राहणार नाही. विशेष मागणी केलेल्या सभेला जर कोरम नसेल तर सभा विसर्जित केली जाईल.

24) अ)राज्याचे अध्यक्ष व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवितील. काही कारणास्तव राज्याचे अध्यक्ष अशा सभेला हजर नसतील तर व्यवस्थापन समिति त्यांच्यापैकी एखादया सदस्याला अशा सभेचे अध्यक्षपद स्विकारण्यासाठी निवडतील.

ब)व्यवस्थापन समितीच्या बैठकीत प्रत्येक प्रश्नाचा/वादाचा निर्णय हजर असलेल्या सदस्यांच्या बहुमताने घेतला जाईल. मतांची समता झाल्यास अध्यक्षपद भूषविण्या--याला (~~अजुन (एक (दुसरे)~~) निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील. अशाप्रकारे झालेला निर्णय हा अंतिम व समितीच्या सर्व सदस्यांना व राज्याच्या सर्व सभासदांना बंधनकारक राहील.

25) अतिशय आणिबाणीच्या प्रसंगी ~~संघटनेचे~~ संस्थेचे सचिव, एखादया सूचनेचे लेखी प्रस्ताव सर्व व्यवस्थापन सदस्याच्या सभासदांना पाठवून त्यांचे मत मागवू शकतो. सभासदाने अशाप्रकारचा प्रस्ताव स्वाक्षरी करून सचिवाकडे परत पाठवल्यास व अशाप्रकारे बहुमत असल्यास अशाप्रकारे झालेला निर्णय अंतिम धरला जाईल.

26) एखादी जागा रिकामी असेल तरी सुध्दा व्यवस्थापन समितीचा कारभार नेहमीप्रमाणे चालू राहील. पण जर सभासदांची संख्या तीन पेक्षा कमी असेल तर अश्या व्यवस्थापन समितीने आधी ~~संघटनेच्या~~ संस्थेच्या सभासदांपैकी काही सभासदांना व्यवस्थापन समितीच्या सभासदाची नियुक्ती करावी.

मालमत्ता व पैसा

27) सर्व स्थावर व जंगम मालमत्तेची जबाबदारी व्यवस्थापन समितीची राहील.

28) जमा झालेली सर्व रक्कम व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीयकृत वा राष्ट्रीय स्तरवरील मान्यता प्राप्त बँकेत जमा करण्यांत येईल.

29) ~~संघटनेच्या~~ संस्थेच्या दैनंदिन कामकाजा व्यतिरिक्त जमा झालेली रकमेची गुंतवणूक सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या नियमानुसार करण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीचा राहील.

30) वरील नमूद केलेल्या अधिकारा व्यतिरिक्त खालील अधिकार व्यवस्थापन समितीस राहतील.

अ. ~~संघटनेच्या~~ संस्थेच्या उददीष्ट पूर्तीसाठी स्थावर व जंगम मालमत्ता भाडयाने, ~~खरेदीने भेट~~ स्वरुपात स्विकारण्याचा अधिकार राहील.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

TRUE COPY
MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary Treasurer

ब. सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या नियमानुसार व संघटनेला योग्य वाटेल त्या पध्दतीने पैसा, कर्ज घेणे व उभा करण्यास मुभा राहील.

क. संघटनेच्या उद्दीष्टपूर्तीसाठी दुस–या विश्वस्त संस्थेशी संलग्न राहण्याची वा दुस–या विश्वस्त संस्थेवर विश्वस्त म्हणून काम बघण्याचीं परवानगी राहील.

सचिवांची कार्य व अधिकार

31) संघटनेच्या महत्वाच्या कामाकरीता व अधिवेशन व परिसंवाद इत्यादी आयोजित करण्यासंबंधी सचिवाने अध्यक्षांशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. (आणीबाणीच्या वेळे व्यतिरिक्त).

32) सर्व महत्वाचे मुद्दे अध्यक्षांच्या कानावर घालणे व त्यांचे मत घेणे.

33) व्यवस्थापन समितीच्या बैठकींमध्ये घेतलेल्या निर्णयांचे कार्यवाही करण्याची जबाबदारी राहील.

अ) गरजेनुसार संघटनेच्या व समितीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांचे कार्यवाही करण्याची जबाबदारी राहील.
ब) संघटनेच्या सर्व कारभारावर नियंत्रण ठेवणे.
क) संघटनेचा सर्व पत्रव्यवहार करणे.
ड) बैठकांचे व सभेचा इतिवृत्तांत ठेवणे.
इ) वार्षिक अहवाल तयार करणे.
एफ) संघटनेचे सामान, वाचनालय/पुस्तके कागदपत्रे हयांची जबाबदारी घेणे.
जी) संघटनेचे येणे असलेले पैसे गोळा करणे व ते बॅंकेत जमा करणे.
एच) संघटनेचे देणे संमत करणे.
आय) संघटनेच्या कामासाठी एकावेळी 10,000/– पर्यंतच्या खर्च करण्याची मुभा राहील. अशा प्रकारच्या खर्च व्यवस्थापन समितीच्या बैठकीत मंजूर करुन घ्यावा लागेल.
जे) हुद्दाच्या नात्याने सचिव सर्व समितीचा सभासद असणे गरजेचे असेल.
के) संघटनेच्या कार्यालयाचे आनुषंगिक/प्रासंगिक इतर सर्व जबाबदा–यांची व कामांची जबाबदारी राहील.

खजिनदारांचे कार्य व अधिकार

34) अ) संघटनेच्या दैनंदिन जमाखर्चाचा हिशेब ठेवण्याची जबाबदारी राहील.
ब) सचिवांनी लेखी संमती दिलेल्या बिलांचा भरणा करणे.
क) बिलांसंबंधातील काही असलेल्या चुका/कमतरता सचिवानां कळविणे व सदरचा मुद्दा त्यांच्याकडे शे–यासह परत पाठविणे. खजिनदार व सचिव हयांच्या दरम्यान सदरच्या मुद्दयाबाबत एकमत होत नसेल तर असे प्रकरण अंतिम निर्णयासाठी अध्यक्षांकडे पाठविणे.
ड) संघटनेचे दरवर्षीचे आवक–जावक, आर्थिक अंदाजपत्रक सचिवांच्या सल्लामसलतीनुसार तयार करणे व मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीसाठी सादर करणे.
इ) हिशेबतपासनीसाने तयार केलेले संघटनेचे हिशेब पत्रक घेणे.
एफ) सर्वसाधारण सभेने नेमणूक केलल्या हिशेबनिसाच्या मदतीने वार्षिक हिशेबपत्रक तयार करणे व व्यवस्थापन समितीसमोर सादर करणे. संघटनेच्या सर्व आर्थिक बाबींची जबाबदारी सचिवांच्या बरोबरीने घेणे.

TRUE COPY
MAHA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics
Secretary
Treasurer

जी) काही कारणास्तव सचिव पद रिक्त झाल्यास सचिव पदाची जबाबदारी पेलवणे.

एच) व्यवस्थापन समितीने संमत केलेल्या वार्शिक/सह अंदाजपत्रक प्रमाणे खर्च करणे. अपवादात्मक परिस्थितीत सचिवांचा अध्यक्षांच्या सल्ल्याने खर्च करणे व तशी नोंद ठेवणे.

अध्यक्षांचे अधिकार व जबाबदा--या

35) अध्यक्ष खालील परिस्थितीत सर्व साधारण सभा सचिवांमार्फत बोलवू शकतील.

अ) अध्यक्षांना आवश्यक वाटल्यास.
ब) व्यवस्थापन समितीने मागणी केल्यास.
क) 10टक्के पेक्षा जास्त किंवा किमान 25 सर्वसाधारण व/किंवा आजीवन सभासदांनी मागणी केल्यास (विषयास अनुसरुन).

अशा प्रकारच्या विशेष सर्वसाधारण सभेत तीन आठवडयाची पूर्वसूचना देणे. सूचनेत सभेचे विषय स्पष्ट करण्यांत यावे. मागणी आल्यास अशी सभा 45 दिवसांच्या आंत घेण्यात यावी. सूचनेत स्पष्ट केलेले विषयांचीच फक्त चर्चा करणे. सभेचे ठिकाण व दिनांक ठरविण्याचा अधिकार अध्यंक्ष व सचिव हयांचा राहील.

36) महत्वाच्या विषयांबाबत अध्यक्ष हे शासकीय/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर पत्रव्यवहार करु शकतात. ज्याची माहिती शाखांना व राष्ट्रीय संघटनेस देण्यांत यावी.

वार्षिक सर्व साधारण सभेविषयी

37) संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा दरवर्षीच्या 31 डिसेंबरच्या आत घेण्यांत यावी.

38) वार्षिक सर्व साधारण सभेत खालील विषय मांडण्यांत यावे.....

1. मागील सर्व साधारण सभेचा वेचक अहवाल सादर करणे.
2. संघटनेचा वार्शिक अहवाल सादर करणे व स्वीकृती घेणे.
3. संघटनेचे वार्षिक आर्थिक अहवाल सादर करणे व स्वीकृती घेणे.
4. हिशोबनिसाची नेमणूक करणे व त्यांचे वेतन ठरविणे.
5. मानद कायदेशीर सल्लागारांची नेमणूक करणे.
6. सुचनेमध्ये सुचित केलेले इतर विषय हाताळणे.
7. सचिवांकडे 30 दिवसांची लेखी सुचना दिले गेलेले विषय हाताळणे.
8. सभेच्या अध्यक्षांच्या सहमतीने इतर विषय हाताळणे.

39) अ. किमान गणसंख्या सभेच्या सुरुवातीस असल्याशिवाय वार्षिक सर्व साधारण सभा सुरु न करणे.

ब. वार्षिक सर्व साधारण सभेसाठी आवश्यक गणसंख्या ही संपूर्ण सभासदांपैकी (~~10टक्के किंवा 10 सर्वसाधारण सभासद व/किंवा आजीवन सभासद~~) हयापैकी जे जास्त असेल ती धरली जाईल. ठरलेल्या वेळेपासून अर्ध्या तासात आवश्यक गणसंख्या उपस्थित नसल्यास बैठक तात्पुरती स्थगीत करण्यांत येईल. सदरची बैठक काही वेळाने त्याच दिवशी परत घेण्यात येईल व अशा बैठकीस गणसंख्येची बंधन राहणार नाही.

TRUE COPY

MAHARASHTRA ACADEMY OF PEDIATRICS
Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary Treasurer

40) सर्व साधारण सभांसाठी एकूण सभासदांपैकी (10टक्के किंवा पंचवीस सर्व साधारण सभासद व/किंवा आजीवन सभासद यापैकी जी संख्या कमी असेल ती) गणसंख्या समजण्यांत यावी. सभा सुरु होण्याच्या ठरलेल्या वेळेपासून अर्ध्या तासात आवश्यक गणसंख्या उपस्थित नसल्यास अशी विशेश सभा रद्द करण्यांत यावी.

41) सभासदांच्या सभेमध्ये प्रश्न देणे व त्यासाठी आवश्यकतेनुसार मतदान घेणे. सममतदान झाल्यास सभेच्या अध्यक्षांचे मत त्यांच्या स्वतःच्या मता व्यतिरिक्त निर्णायक समजण्यांत यावे.

42) सर्व साधारण वार्शिक सभा, साधारण सभा व विशेष सभा यामध्ये संमत झालेले विषय प्रत्यक्षात आणण्याची कार्यवाही व्यवस्थापन समितीने करणे.

43) आवश्यक सुचना सर्व सभासदांना युपीएस (अंडर सर्टिफिकेट ऑफ पोसटींग) व्दारे शेवटच्या उपलब्ध असलेल्या पत्त्यावर पाठविणे.

44) सर्व सुचना, पत्रके व इतर कागदपत्रे सचिवांच्या सहीने जावेत.

45) संघटनेचे मोहर/सील व्यवस्थापन समितीकडे सुरक्षित ठेवण्यांत यावी. ही मोहर फक्त व्यवस्थापन समिती सदस्य, अध्यक्ष हयांच्या उपस्थितीतच वापरण्यांत यावी.

46) ज्या कागदपत्रांवर मोहर उमटवायची असेल ती प्रक्रिया अध्यक्षांच्या उपस्थितीत सचिवांनी करावी व तसे केल्याची स्वाक्षरी अध्यक्ष व सचिव यांनी करावी.

47) राज्य संघटनेच्या सर्व कागदपत्रांवर व सर्व प्रकाशनांवर राज्य संघटनेचे चिन्ह व नोंदणी क्रमांक व राष्ट्रीय संघटनेचे चिन्ह असावे.

48) संघटनेची कार्य

अ. संघटनेचे सर्व सभासदांना समाजातील सर्व स्तरांवर प्रतिनिधीकता मिळावी हया दृष्टीने संघटनेचे प्रयत्नशील असावे.

ब. संघटनेने वरचेवर वैद्यकीय बैठका, अधिवेशने, कार्यशाळा, प्रदर्शने, प्रश्न मंजुशा, सामाजिक कार्य व इतर बालरोग क्षेत्राशी निगडीत कार्यक्रम आयोजित करणे.

क. संघटनेतर्फे वैद्यकीय, शैक्षणिक उपयुक्त पुस्तके, नियतकालिका प्रकाशित करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणे.

ड. संघटनेने आपल्या क्षेत्रातील शासकीय, निम शासकीय व खाजगी दवाखाने यांची माहिती ठेवणे.

इ. संघटनेने अपुरे मनुष्यबळ अपुरी वैद्यकीय सेवा आवश्यक औषधांचा तुटवडा, कमी दर्जाची औषधे या संदर्भातील विषय योग्य त्या विभागांना कळविणे.

एफ. सर्व वार्षिक घडामोडींचा अहवाल राष्ट्रीय संघटनेच्या नियमानुसार तयार करणे. राष्ट्रीय संघटनेच्या वार्शिक बैठकीसाठी संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांनी उपस्थित राहणे.

49) फायनान्स – आर्थिक व्यवहार

अ. संघटनेच्या विविध कार्यासाठी वर्गणी, जाहिराती, नोंदणी फी किंवा इतर व्यावसायिक नितीमत्तेस अनुसरुन योग्य मार्गाने निधी उभारणे.

ब. संघटनेच्या वार्षिक हिशेब राष्ट्रीय संघटनेस दरवर्षी सादर करणे.

TRUE COPY

Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

Secretary Treasurer

नमुन्यात सभासदांची यादी ठेवण्यात येईल. (महाराष्ट्र) १९७१ मधील नियम १५ प्रमाणे अनुसूची १ मध्ये ... कलम ४ नुसार संस्था नोंदणी कायदा १९७१ मधील नियम ५ प्रमाणे अनुसूची २ च्या नमुन्यात बदल कार्यकारी मंडळाची यादी सहायक संस्था निबंधक यांचे कार्यालयात पाठविण्यात येईल.

50) भाषा

अ. ~~संघटनेची~~ संस्थेची ~~(प्रथम)~~ अधिकृत कार्यालयीन भाषा मराठी व इंग्रजी राहील.

ब. ~~संघटनेची द्वितीय अधिकृत कार्यालयीन भाषा मराठी राहील.~~

क. ~~सर्व शासकीय प्रेस्के इंग्रजीमध्ये राहील.~~

51) सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता नाशिक शहर न्यायालयीन कक्षेत सचिव पदामार्फत करण्यांत येईल.

52) वरील सर्व नियमावली व्यतिरिक्त राज्य संघटना आवश्यकतेनुसार योग्य ते नियम व पायांडे बनवू शकेल, जे राष्ट्रीय संघटनेच्या नियम व पायंडयाशी सुसंगत असेल. ~~(असे नियम व पायंडे यात आवश्यकतेनुसार राष्ट्रीय संघटनेचे व्यवस्थापन समिती बदल करु शकेल.)~~ काही वादग्रस्त मुद्दे व नसलेल्या नियमांबाबत व पायंडयाबाबत राष्ट्रीय संघटनेचे नियम/पायंडे व/किंवा राष्ट्रीय व्यवस्थापन समितीचे निर्णय अंतिम समजण्यांत येतील व राज्य संघटना व तिचे सभासद यांच्यावर ते बंधनकारक राहील.

53) नियमावलीत बदल :–

नियमावलीतील कुठलाही बदल, सुधारणा किंवा नवीन नियम करण्यासाठी आधी नियमानुसार सुचित केलेल्या विशेष सर्व साधारण सभेमध्ये ~~3/4~~ 3/5 बहुमताने संमत झाल्याशिवाय करता येणार नाही व तोच बदल 1 महिन्यानंतर हयाच कारणास्तव दुस–या विशेष सर्व साधारण सभेत/वार्शिक सर्व साधारण सभेत पुन्हा बहुमताने संमत झाल्याशिवाय ग्राहय धरण्यांत येऊ नये.

54) विसर्जन :

संस्था बंद करावयाची असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने, सर्वसाधारण सभेत मंजुरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे घेणे बाबतचे व्यवहार पूर्ण करावे लागतील. तसेच संस्थेची शिल्लक मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान करता येईल. १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

55) नियम आणि नियमावलीत बदल करण्याची तरतूद, संस्थेच्या नियम आणि नियमावलीमध्ये दुरुस्ती बदल करावयाचा असल्यास, वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने ठराव मंजूर करण्यात येईल. १८६० संस्था नोंदणी अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

खरी प्रत / नक्कल

TRUE COPY

MAHA ACADEMY OF PEDIATRICS

Maharashtra State Branch of Indian Academy of Pediatrics

नाशिक विभाग, नाशिक.

Secretary Treasurer